# 'चिन्हांकित यादीतली माणसं ' या कथासंग्रहातील ग्रामजीवनातील वास्तव

**डॉ. किशोर आर. पाठक**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग प्रमुख,
पंकज कला महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव
karuna.kishor @gmail.com

गोष्ट सांगणे व ऐकणे हे प्रत्येकाला आवडते. गोष्ट सांगतांना सांगणा-याला आनंद वाटत असतो. म्हणूनच कथेतून मानवी जीवनाचे दर्शन घडत असते. कथेव्दारे मनोरंजना सोबतच नितीबोध सांगितला जातो. म्हणूनच मानवी जीवनाचे दर्शन हे कथेतून घडत असते. मानवीजीवनातील आकाक्षापूर्तीसाठी कथेचा उपयोग केला जातो. मानवी जीवनातील आनंद हा कथेतून अनुभवता येत असतो. असा हा वाङ्मय प्रकार प्राचिन काळापासून प्रचिलीत होता. त्यातून भरपूर असे लेखन झाले आहे. लेखकाने जे समाजात अनुभवलेले असते ते काल्पनिक पात्रांच्या माध्यमातून मांडले जाते. असे असले तरी कथा हा एक महत्वाचा साहित्य प्रकार आहे. अशा या कथा साहित्य प्रकारा विषयी डॉ संदीप माळी लिहतात,"कथा हा साहित्यप्रकार म्हणूनच मावनी आविष्काराच्या अगदी जवळचा आहे. आजवर अनेक साहित्यिकांनी आपल्या मुक्त अभिव्यक्तीसाठी कथा हा साहित्य प्रकार गंभीरपणे स्विकारला आहे. "[1] अशा या कथा साहित्य प्रकारात भरपूर लेखन होवून त्यातून लेखकांनी आपल्या लेखनातून मूक्त अभिव्यक्ती व्यक्त केली आहे.

'चिन्हांकित यादीतली माणस' हा माधव जाधव यांचा कथासंग्रह पुण्याच्या सायन पब्लिकेशन ने प्रकाशित केला आहे. यात एकूण सतरा कथा आहेत. या सर्व कथांमधून ग्रामीण जीवनाचे वास्तव वर्णन आले आहे. या सर्व कथांमधून खेडयातील माणस व त्यांचे बदलते स्वरुप यांचे दर्शन घडवले आहे. या कथा संग्रहातून ग्रामीण जीवनाचे खरेखुरे दर्शन घडत आहे. या कथासंग्रहा विषयी नागनाथ कोत्तापल्ले लिहतात, "एकंदरीत जागतिकीकरणानंतरचे, यंत्रांची भर पडलेले आणि शहराच्या आश्रयाने उभे राहू पाहणारे आजचे गाव येथे अतिशय प्रत्ययकारी होऊन उभे राहते. मराठवाडयाच्या बोलीमूळे ते अधिक साक्षात होते, हेही माधव जाधव यांच्या कथेचे वेगळेपण आहे. "[2] थोडक्यात या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनाचे अतिशय प्रभावी असे दर्शन घडते. ग्रामीण जीवनातील वास्तव स्थितीचे वर्णन यातून लेखकाने करुन दिले आहे.

या कथासंग्रहातील 'शिकवणी' या कथेत गजराभाभी ही प्रतिकूल परिस्थितील आपल्या मूलाला शिकवते तो डी.एड झाल्यावर त्याला मास्तर होण्याचे स्वप्न पाहत असते. पण भाभीची ही ईच्छा पूर्ण होत नाही. त्यावेळी नामू हा देखील हा आहे त्या परिस्थितीशी संघर्ष करत नोकरी मिळत नाही म्हणून न थांबता तो खाजगी शिकवणी घेतो. व भाभीला देखील त्यातून समाधान वाटत असते. या कथेतून ग्रामीण भागातील शिकलेल्या तरूणाचे विचार आज कसे बदलत आहेत हे दाखवले आहे. या कथेतील निवेदकाला वाटते, "खरंच गाव बदललं नाही, असं आपण उगीच म्हणतो. नामूसारखं एकेक पोटटं बदलत गेलं त गाव बदलाय किती वेळ लागणार हाय."[3] यातून ग्रामजीवनातील वास्तवाचे दर्शन घडवून आज ग्रामीण भागीतील सुशिक्षीत तरूण हे नोकरीच्या ऐवजी जे मिळेल त्याला प्राधान्य कसे देतात याचे वर्णन आले आहे.

'पर्याय' या कथेत सोयाबिनची निंदणी करायला मजूर मिळत नाहीत. तेव्हा या कथेतील रमेश हा शेतात तणनाशक मारायचे ठरवतो. पण प्रत्येक वेळी त्याचे वडिल त्याला विरोध करतात. शेवटी त्याचे वडिलच तणनाशक आणून देतात. पण ते तणनाशक शेतात मारायला मजूर न मिळाल्याने रमेश हा शेतात स्वत: शेतात तणनाशकाची फवरणी करतो. यातून कथालेखकाने ग्रामीण जीवनातील वास्तव मांडतांना आज मजूरांवर अवलंबून शेती केली तर खर्च जास्त येतो व वेळेत काम होत नाही हे सांगितले आहे. पण रमेश सारखी मूल हे स्वत: आधूनिक शेती करुन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करत आहेत. तसेच पारंपारिक पिके घेण्या ऐवजी इतर पिकांचा देखील विचार करत आहेत. 'एकात एक' या कथेत बारक्याला सुधारण्याची संधी मिळाली त्यामूळे तो दुधाचा व्यवसाय सुरु करतो. सहा महिन्यात दादाला नवी गाडी घेण्याचे ठरवतो. थोडक्यात जर ग्रामीण तरुणाच्या हाताला रोजगार मिळाला तर त्याचे जीवनमान हे बदलू शकते त्याच्यात परिवर्तन होते हे माधव जाधव यांनी येथे सांगितले आहे.

'हिसका' या कथेत गोविंद कावळे हा गावातील साध्याभोळया लोकांची लूबाडणूक करतो. तो त्याच्या मित्राची पत्नी शारदाला तो बॅंक मॅनेजरच्या मदतीने फसवत असतो. पण जेव्हा शारदाने "लावा साहेब आत्ताच पाटलाला फोन....नाही तर सांगा काय काम व्हस ते... काम सांगितल्या शिवाय मी उठणार नाही"[4] असे ठणकावून सांगितले.त्यावेळी मॅनेजर गोविंदचे नाव सांगतो. व त्याला वठणीवर आणण्यासाठी शारदा त्याच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार देते. यातून शारदा मध्ये झालेला बदल व गोविंद कावळे सारखी माणसे ही लोकांच्या परिस्थितीचा गैरफायदा कसा घेतात हे दाखवले आहे.

'दु:खाचे टावर सुखाची रेंज' कथेतील घरची शेती असणारा सायबू हा उच्चशिक्षीत असूनही नोकरी करत नाही. त्याच्या वडिलांना नोकरी पेक्षा शेती महत्वाची वाटते. पण पूढे हाच सायबू एक कापड दूकान सुरु करण्याचे सांगतो.त्याला नुसत शेतीवर अवलंबून राहणे आवडत नाही. यातून आज ग्रामीण भागात शेतीकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टीकोनाचे वर्णन आले आहे. या कथेत निवेदक सांगतात, "गावाच्या सुखाचे कव्हरेज वाढवण्यासाठी कुणीतरी येऊन टॉवर उभारणार नसते, ते आपल्याला उभारावे लागते. तेव्हा कुठे दु:खाच्या टॉवरखाली सुध्दा सुखाची रेंज येऊ लागते. "[5]

'बिचारी आणि विचारी' या कथेत सुधाकर हा आपल्या शेतात मेढया बसवण्यासाठी मुकादमाला भेटतो, तेव्हा मुकादमाने त्याची सांगितलेली परिस्थिती सुधाकरला अस्वस्थ करते. याचे वर्णन यात आले आहे. 'मायमया' या कथेत नाथा व संता यांची आई घरात वारल्यावर तिला कोठे बसवायचे यावरून चाललेले भांडण यातून आई जीवंत असतांना तिच्याकडे कोणीही लक्ष देत नाही पण ती वारल्यावर तिच्या विषयी दोघ मूले हे नाटकी वर्तन कसे करतात हे या कथेतून मांडले आहे. त्यातून ग्रामीण जीवनात होणारी वृध्दांचे वास्तव असे वर्णन आले आहे. या कथा संग्रहातील मराठवाडी बोलीच्या वापरामूळे सर्वच कथा या वाचनिय झाल्या आहेत. 'नामा आज्या' या कथेतील नामा आज्या हा गावात सर्वांशी चांगले वागतो. पण त्याच्या पत्नीशी म्हणजे आजीशी तो चांगले वागत नाही. तो आजी गेल्यावर मूक्त होत असतो. यातून कथाकाराने बाहेर चांगली वागणारी माणस ही घरात वागतांना त्यांचे वर्तन हे कसे बदलत असते याचे दर्शन घडवले आहे. 'चिन्हांकित यादीतली माणस' या कथेत गावातील ग्रामपंचायत निवडणूकीत पैश्याचा होणारा वापर व त्यात सत्ता मिळवण्यासाठी पैश्याची होणारी उलाढाल यात सर्वसामान्य गरीब माणूस कसा अडकतो. याचे वर्णन आले आहे. जेव्हा विजय वाडीकर हा पैसे देवून निवडत नाही तेव्हा तो विलासला सांगतो की, नेमके लोकांनी मत कोणाला दिले याची आपण चौकशी करायची. ही माणसे गावातील रंगाकडे जेव्हा येतात तेव्हा तो आलेल्या प्रसंगाला तोंड देत असतो. आपण

दोघांनाही मतदान केले, तुम्ही कोणाला मतदान करा हे सांगितले नाही असे सांगतो. यातून ग्रामीण भागात देखील आज पैश्याच्या जोरावर निवडणूक होत असते असे असले तरी निवडून येईल याची कोणतीही शाश्वती नसते हे वास्तव या कथेतून मांडले आहे.

थोडक्यात या कथासंग्रहातील काही कथांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनातील वास्तव पाहत असतांना येथील काही माणसे ही स्वार्थी आहेत तर काही संधीसाधू आहेत. या कथासंग्रहातून कथाकाराने ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकून आजचे वास्तव साकारले आहे. यातून समाजात असणा-या दृष्ट व सृष्ट माणसांचे वर्णन यातून आले आहे. हा कथा संग्रह ग्रामीण जीवनाचे अतिशय समर्थपणे वर्णन करतो. व समाजजीवनातील वास्तव मांडत आहे.

**संदर्भ**

1. माळी संदीप, हमीद दलवाई निवडक कथा आकलन आणि आस्वाद, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, प्र.आ. 2018 पृ.क्र. 25
2. जाधव माधव, चिन्हांकित यादीतली माणस, सायन पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ. 15 ऑगस्ट 2020 मलपृष्ठ
3. तत्रैव पृ.क्र. 15
4. तत्रैव पृ.क्र. 55
5. तत्रैव पृ.क्र. 66